पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३९/२०१९
दिनांक : १९/०१/२०१९

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **२३/०१/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२३/०१/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७**

**दिनांक : २३/०१/२०१९** **वेळ : दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **बुधवार** दिनांक **२३/०१/२०१९** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात भिमसृष्टी तयार करण्याचे काम सध्या सुरु आहे. सदर भिमसृष्टीचे काम सुरु असताना स्थानिक नगरसदस्य व नगरसदस्या, धम्मदीप प्रतिष्टान, पिंपरी व डॉ.बी.आर.आंबेडकर ग्रुप निगडी या संघटनेने सदर ठिकाणी माता रमाई आंबेडकर यांचा पुतळा व उद्यान विकसित करण्याची मागणी केलेली आहे. या मागणीचा विचार करून मा.महापौर यांनी याबाबत योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. तरी पिंपरी चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात माता रमाई आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



(उल्हास बबनराव जगताप)

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/३९/२०१९

दिनांक : १९/०१/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc